संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# हे तर धोकादायक सूडयुद्ध

**आंतरराष्ट्रीय** स्तरावर शांतता नांदावी यासाठी सगळीच मोठी राष्ट्रे प्रयत्न करीत असतात. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांतला अनुभव लक्षात घेतला तर शांततेसाठी युद्ध हा एक नवा पर्याय किंबहुना अजब पर्याय जगानेच स्वीकारलेला दिसतो. काही राष्ट्रे ही इतकी मदांध आणि धर्मांध असतात की, ज्यांची ओळख हुकुमशहा किंवा दहशतवादी राष्ट्र म्हणूनच करून द्यावी लागते. संपूर्ण देशाची निरंकुश सत्ता आपल्या हातात राहावी म्हणून जगातली बरीच इस्लामिक राष्ट्रे याच हुकुमशाही आणि दहशतवादी मार्गाचा अवलंब करतात. याच वर्चस्ववादातून अनेक वर्षे इराण-इराक युद्ध पेटलेले होते. तर आता इराणला सर्वेसर्वा होण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. विशेषतः पश्चिम आशियामध्ये आपले वर्चस्व ठेवण्यासाठी इराणने असाच धर्मांधपणाचा पर्याय निवडला. आणि अण्वस्त्र तयार करण्याच्या कामालाही सुरुवात केली होती. ही बाब अमेरिकेच्या आणि संयुक्त राष्ट्र संघाच्याही लक्षात आली. या सत्तापिपासू महत्त्वाकांक्षेपासून इराणमधल्या अयातुल्ला खामेनी राजवटीला वेळोवेळी आवाहन केले गेले. परंतु ते यशस्वी झाले नाही. आपली दहशतवादी प्रतिमा कायम ठेवत इराणने वेळोवेळी अमेरिकेशी पंगा घेतला आणि अण्वस्त्र नाहीसे करण्याच्या आव्हानालाही धाब्यावर बसवण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच संतप्त झालेल्या अमेरिकेने आणि इस्त्रायलनेसुद्धा इराणविरुद्ध संयुक्त मोहीम उघडली. हे पहिले असे युद्ध आहे की, ज्यात एखाद्या राष्ट्राचा प्रमुख आणि त्याचे बरेच नातेवाईक ठार करण्याचा प्रकार घडला. खामेनींच्या अंत्ययात्रेला जी गर्दी झाली होती, ती पाहिल्यानंतर अमेरिकेला अपेक्षित असलेले सत्तांतर तिथे कितपत घडून येईल याबद्दलही शंका वाटते. दुर्दैवाने इराणने आणि अरब देशांवर हल्ले केल्याने तो प्रकार म्हणजे इराणने हे युद्ध ओढवून घेण्यासारखेच म्हणावे लागते. जवळपास दहा अरब देशांमधल्या अमेरिकी तळांवर इराणने केलेले हल्ले हे म्हणजे एकाचवेळी अनेक शत्रू निर्माण करण्यासारखे ठरते. ज्या पद्धतीने इराण आणि इतर देशांवर क्षेपणास्त्र डागली जात आहेत ते पाहाता हे शांततेचा उद्देश सोडून एकमेकांविरुद्धचे सूड युद्ध सुरू झाले आहे.

### इराणने ओढवलेले युद्ध

या सगळ्या पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीचा विचार केला तर हे युद्ध लवकर थांबणे अनेक देशांच्या हिताचे ठरते. मात्र ते थांबण्याची चिन्हे दिसत नाही. मुळातच अरब देशांमध्ये असलेला शिया सुन्नींमधला वैरभाव प्रचंड स्वरूपाचा आहे. खामेनी यांची हत्या झाल्याबरोबर अनेक देशांत निदर्शने झाली. पाकिस्तानात कराचीमध्ये थेट अमेरिकन दूतावासच जाळण्याचा प्रयत्न केला गेला. ही घटनादेखील अमेरिकेच्या जिव्हारी लागण्याची शक्यता आहे. इतक्या धर्मांधतेने आणि आक्रमकतेने अमेरिकी कार्यालया लक्ष्य करण्याचा निदर्शकांचा प्रयत्न म्हणजे अमेरिकेवरच्या रागाचा हिंसक पद्धतीने बदला घेण्याचा पारंपारिक प्रयत्नच म्हणावा लागतो. यापूर्वीसुद्धा काश्मिरमध्ये अशा प्रकारची निदर्शने झाली होती. परंतु यावेळच्या निदर्शकांना अधिक कठोरपणे लगाम घातला गेला आहे. भारतासारख्या लोकशाही आणि प्रजासत्ताक देशात परकीय राष्ट्रातील कुठल्यातरी घटनेवरून निदर्शने करण्याची प्रवृत्ती धोकादायकच ठरते. यामधून धर्मांधता आणि दहशतवादाचाच पुरस्कार करण्याची मनोवृत्ती पाहायला मिळते. या हल्ल्याचे काही परिणाम भारतावरही होण्याची शक्यता आहे. विशेषतः भारताच्या तेलव्यापारावर मोठा परिणाम होऊ शकतो. म्हणजेच पेट्रोल-डिझेलच्या टंचाईवरून त्याचे भाव वाढण्यापर्यंत परिणाम पाहायला मिळू शकतात. भारताने युद्ध थांबवण्याचे आव्हान केले आहे. युनायटेड अरब अमिरातीवर इराणने केलेल्या हल्ल्याचा निषेध केलेला आहे. प्रामुख्याने या अरब देशांमध्ये तेल व्यापार प्रमुख असल्याने त्याच्या अर्थकारणाला मोठ्या झळा पोहोचू शकतात. भारताची बरीच मोठी तेलआयात याच देशांकडून होत असते. म्हणूनच हे युद्ध लांबणे भारतासाठी फारसे हिताचे नाही. युद्ध थांबवण्यासंदर्भात भारताने केलेले आवाहन अनेक अर्थांनी महत्त्वाचे ठरते. भारताबरोबरचे या सर्व देशांचे संबंध आणि त्याही देशांना पोहोचणाऱ्या युद्धाच्या झळा यामधून सगळ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. एकाअर्थी इराणने अनेक शत्रू निर्माण करून युद्धाची तीव्रता वाढवली. आणि अमेरिकी तळांवर हल्ले केल्याने स्वतःचेही मोठे नुकसान करून घेतले आहे.

### अडकलेले भारतीय

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांना इराणमध्ये सत्तांतर हवे आहे. तिथल्या परंपरागत शहा घराण्याकडे तिथली सूत्रे जावीत आणि अधिक लोकशाहीयुक्त कारभार तिथे व्हावा यासाठी हे युद्ध महत्त्वाचे असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. परंतु आता प्रत्यक्ष सत्तांतर केव्हा घडून येईल हे सांगता येत नाही. परंतु अमेरिकेविरुद्धचा रोषही इतक्या सहजासहजी थांबण्यासारखा दिसत नाही. युद्धाचा हा आगडोंब उसळला असताना अनेक अरब देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका करणे हेदेखील मोठे आव्हान आहे. या सगळ्या अरब देशांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय राहतात. अनेक भारतीय हे पर्यटनाच्यानिमित्ताने अबुधाबी किंवा दुबईत गेलेले आहेत. परंतु हवाई वाहतूकच बंद झाल्याने ते तिथे अडकून पडले आहेत. याचा अर्थ अमेरिकेने अचानकपणे हे युद्ध सुरू केल्याने आणि इराणकडून या अरब देशांवर हल्ले होतील याची कल्पना न आल्याने भारताला आपल्या लोकांसाठी सावधगिरीची सूचना देता आली नाही. याची थोडीफार पूर्वकल्पना आली असती तर अगदी दुबई, अबुधाबी या ठिकाणच्या भारतीय लोकांना परत बोलावून घेता आले असते. ती संधी न मिळाल्याने या अडकलेल्या भारतीयांना परत आणण्याची विशेष मोहीम भारताला राबवावी लागेल. त्या त्या देशांच्या सरकारांना विनंती करून भारतीयांची ही विमाने सुरक्षितपणे उड्डाण करू शकतील याचे आश्वासन मिळवावे लागेल. एकूणच पश्चिम आशियातल्या या अशांततेनेच नव्या अस्थिरतेलाच जन्म दिलेला आहे.